# परिमला

गीतसंग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २५५४८ वि: ०३/०५
क्रमांक १४५० नों: दि: २५/३/५०

१०६०१

REFBK-0010601
REFBK-0010601

संजीवनी मराठे

# अनुक्रमणिका

१. उमललीं ताराफुलें
२. नील पांखरा
३. लागे छंद मनास
४. चंद्रच जेव्हां----
५. तेवतां तेवतां
६. हृदयींच्या राउळांत
७. मोगरिचे बहर आज
८. वास्तवाच्या वाळवंटीं
९. तुझ्या प्रेमामधें
१०. नयनांत नीज मी
११. नाहिं घडली सेवा
१२. उभा पाठिशीं
१३. गीत मला गाउं दे
१४. सख्या पहांट जा़हली
१५. गाऊं या मंगलगान
१६. भाववेगें येउं पाहे
१७. जनमान्तरिंचें प्रेम
१८. सोनियाचा पाळणा
१९. नकळतां निघून जा
२०. राष्ट्रध्वज फडकतो
२१. आठवतें दिनरात
२२. आभाळाच्या अम्ही मुली
२३. मीं दिवाणी
२४. पुढतिं जायचें रे
२५. तुझ्याविना ब्रिजलाला
२६. स्वप्नांत येउं कां?
२७. फिरून एकदां
२८. तूं नसतांना
२९. विसरून जा, विसरून जा!
३०. हे हिंदभूमिच्या प्राणा !

★

एकमेव विक्रेते: **साधना प्रकाशन,** ४३०–३१ शनवार, पुणें २.

प्रथमावृत्ति १९५९ सर्वाधिकार स्वाधीन मूल्य १ रुपया

प्रकाशक : **संजीवनी मराठे,** ३९/४० एरंडवन, पुणें ४

मुद्रक : **चिं. ग. वझे,** साधना प्रेस, ४३०-४३१ शनवार, पुणें २

## १. उमललीं ताराफुलें–

नील आकाशांत नाथा उमललीं ताराफुलें !

धुंद माझ्या लोचनांनीं बहर त्यांचा वेचिला
अंगअंगीं हार त्यांचे माळुनी मी घेतले

त्या फुलांनीं जागवील्या मागल्या साऱ्या स्मृती
उग्रता गेली दिसाची, शांत झालीं वादळें !

गायिलीं मी गूढ गाणीं, मूक स्वप्नें ऐकिलीं,
नाचलें मी, हांसलें मी, आंसवांनीं नाहलें !

हर्षखेदाचे उमाळे आज झाले मोकळे
परिमळा मी, भान माझें अंबरीं झेंपावलें,

नील आकाशांत नाथा उमललीं ताराफुलें !

* *

REFBK-0010601
REFBK-0010601
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २४५४८ वि: ...
क्रमांक ...९०५० नों दि: २५/३/५०
१०६०१

## २. नीलपांखरा –

नीलपांखरा, नील नभीं तू लहरत विहरत जासी
करीत मुजरा दिशोदिशेंतुन भरल्या चैतन्यासी
रात्र सरे, अंधार विरे, नभिं तेज रवीचें पसरे
दुःख वितळलें, सुख पाझरलें, जीवन झालें हसरें
स्वानंदाचा गंध कोंदला सुमनांच्या निश्वासीं !
रे तू लहरत विहरत जासी !

फुलवुनि अपुला भव्य पिसारा फिरे अंबरीं वारा
त्यावर होउन स्वार अनावर करिसी गगनविहारा
सौंदर्याची तृषा अशी रे सहर्ष पुरवुन घेसी
रे तू लहरत विहरत जासी !

रसचतुरा रे उतर जरा कर सेवन मधुर रसाचें
जा कंठांतील अमृत उधळून पुरवुनि सुख श्रवणांचें
गुंतवुनी मज नेई तुजसम निळ्या प्रीतिच्या पाशीं
रे तू लहरत विहरत जासी !

* *

## ३. लागे छंद मनास !–

हसतिल मजला कबीर मीरा हसतिल तुलसीदास,
हरि तुझा लागे छंद मनास !

कुठें मनींचा क्षुद्र काम, ती कोठें अमृत आस ?
कुठें सरोवर, कोठें सागर, तुलना करूं कशास ?
हरि तुझा लागे छंद मनास !

नक्षत्रांकित चंद्र कुठें तो, कुठें सानुली कांच ?
कुठें स्वर्गिचा कल्पतरु अन् कोठें मरवा पांच ?
हरि तुझा लागे छंद मनास !

कबीर गाती, गाते मीरा, गाती तुलसीदास,
गीत भाबडें गाउं कुणा मी ? प्रभु घे तुझें तुलाच !
हरि तुझा लागे छंद मनास !

* *

## ४. चंद्रच जेव्हां झळकुनि गेला –

चंद्रच जेव्हां झळकुनि गेला माझ्या प्राणांतुनी
कणाकणांतुन जाय निनादत ज्योत्स्नेची रागिणी

फुलल्या ग नवभावकुमुदिनी पराग लवथवले
मधुरतेंत अनिवार तळींचें जीवन रसरसलें

विरहतमांतुनि सुटलें ग मी, मिटलें आलिंगनीं
चंद्रच जेव्हां झळकुनि गेला माझ्या प्राणांतुनी

डोळे झाले रसहिंदोळे, झुलल्या दाहिदिशा
तेजाशीं सोयरीक जुळली, आली भाग्यदशा

चराचराची प्रीत राहिली अंतरंग व्यापुनी
चंद्रच जेव्हां झळकुनि गेला माझ्या प्राणांतुनी

* *

## ५. तेवतां तेवतां –

तेवतां तेवतां वात मंदावली
अजुनि ना मंदिरीं पाउलें वाजलीं

पूजना जीं सुमें आणिलीं वेचुनी
तीं वियोगें तुझ्या म्लानता पावलीं,

पायवाटा किती रेखिल्या दिनभरी
लोपवाया तयां रात्र अंधारली

गावया गीतकें भक्तिचीं प्रीतिचीं
उतरते सारखी तार जी लाविली,

बधिर या जाहल्या अंतरींच्या कळा
वाणिची बासरी भंगली शांतली,

जन्मजन्मांतरीं राहिली जी दुरी
घाल आतांतरी दिव्य ती साउली,
तेवतां तेवतां वात मंदावली !

* *

## ६. हृदयींच्या राउळांत –

हृदयींच्या राउळांत येई प्रीतिदेवा !
हिरवळल्या राईतुन वाट लाजरी वळते
पवन फिरे मंदमंद, जल शीतळ झुळझुळतें
कोमल पिककंठांतुन गानमाधुरी झरते
सुप्रभातिं प्रांगणांत तव पदरव यावा,
हृदयींच्या राउळांत येई प्रीतिदेवा !

तू येतां विझणाऱ्या झळकतील ज्योती
तू येतां विरणाऱ्या नादतील गीती
तू येतांक्षाणिं खुलेल पर्णपुष्पकांती
पदधूळी हासवील श्रांत मनोभावा
हृदयींच्या राउळांत येई प्रीतिदेवा ।

स्नेहरसें न्हाणिन तव मूर्त मनोहारी
समर्पुनी देइन पदिं क्षणिक सुखें सारीं
समरसता अनुभवीन भान हरविणारी
सोन्याचे क्षण वेंचिन, करिन तुझी सेवा
हृदयींच्या राउळांत येइ प्रीतिदेवा !

* *

७. मोगरीचे बहर –

मोगरिचे बहर आज सुकुनि चालले रे
उरला अपुराचि हार
वीणेची तुटत तार
सहवेना विरहभार मन उदासले रे

उत्सवांत रमति कुणी
गाती मधुगीत कुणी
मीच मात्र आंसवांत न्हात राहिलें रे

रोहिणीस धरुनि करीं
विहरतसे चंद्र वरी
वेडावुनि वरुनि तयें मजसि पाहिलें रे

ऋतु वसंत दशादिशांत
प्रणयिजना तोषवीत
वैऱ्यापरि मज त्यानें झुरत ठेविलें रे

ये धावत प्रियसखया
रमवाया–सुखवाया
तुजवांचुनि अति व्याकुल प्राण जाहले रे

* *

## ८. वास्तवाच्या वाळवंटी –

वास्तवाच्या वाळवंटीं, वास आहे आपुला
येथ नाहीं साथ कोणी, तू मला अन् मी तुला !

कल्पनांच्या येथ बागा, घेउनीयां प्रीतिधागा
स्वप्नपुष्पांचा गळां मी हार आहे गुंफिला !

प्रेरणांचे मंत्र गाऊं, त्यांचिया बंधांत राहूं
तेवत्या ठेवूं सदा रे, भावज्योती आपुल्या !

छंद घेऊं संगतीचा, खेळ खेळूं या गतीचा
पार जाऊं सीमिताच्या स्वर्ग पाहूं तेथला !

येथ नाहीं साथ कोणी तू मला अन् मी तुला !

* *

९. तुझ्या प्रेमामध्यें रंगलें मी –

तुझ्या नामामधें, तुझ्या धामामधें
तुझ्या प्रेमामधें रंगलें मी

तुझी कीर्तिवेल फुले घडीपल
दाटे परिमल, भुललें मी

तुला कळों आल्या अंतरींच्या खुणा
अशी बोलाविना वदलें मी

तुझ्या निळ्या नभीं तुझ्यासंगें उभी
वाटेविना वरी चढलें मी

तुझ्या कृपेचिया सुखसरोवरीं
देवा, पुरी पुरी बुडलें मी
रे तुझ्या प्रेमामधें रंगलें मी

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २५५४८ वि: काव्य
क्रमांक ९४५० नों: दि: २०/३/५०

## १०. नयनांत नीज मी सांठवितें –

नयनांत नीज मी सांठवितें
तें गोड स्वप्न मनिं आठवितें.

अशीच होती रात्र चांदणी
रंगत होत्या तारा नर्तनिं
गुंग चराचर गीतगायनीं
ती अद्भुत जादू मनिं भरते

दिव्य मूर्तिची सुखद साउली
हळूंच माझ्या मंदिरिं आली
स्मितें सुगंधी भंवतीं फुललीं
स्वप्नांत स्वप्न जणुं मी बघतें.

स्कंधावरुनी ओढणी गळे
केशपाश शिरिं मुक्त सळसळे
धुंद गोड मम नयनीं तरळे
मज जिंकियलें मदनें पुरतें.

हृदयेशें मज जवळिं घेतलें
गुपित गोडसें कानीं कथिलें
लाजत मी कांहीं पुटपुटलें
त्या रम्य स्मृती मनिं पालवितें.

अशीच राहो रात्र चांदणी
नशा चढो माझिया लोचनीं
जीवन पाहूं दे मज स्वप्नीं
ज्या वांचुनि जग हें आज रितें
तें गोड स्वप्न मनिं आठवितें.

* *

## ११. नाहीं घडली सेवा

नाहीं घडली सेवा
केवि देवा हातिं यावा तुझ्या कृपेचा ठेवा ?

भजनपूजनीं नाहिं रमलें
कीर्तनरंगीं नाहिं रंगलें
कधिं न गायिलीं महिमागीतें कधीं न केला धावा !

अहंपणाची प्रतिमा करुनी
पूजियलें तिजला दिनरजनी
अशांतिचा शिरिं शाप घेउनी तुझ्या लागतें पायां !

आसऱ्याविना राहुं कुठें मी
तुज शोधाया येऊं कुठें मी
अथांग जीवनिं गुदमरतें मी, ये परतीरा न्याया !
नाहिं घडली सेवा !

* *

## १२. उभा पाठिशीं असशिल ना –

पद टाकिन मी, परि दयाघना
तू उभा पाठिशी असशिल ना ?

प्रखर वाहुनी पिसाट वारे
नाशितील वनवैभव सारें
परि पर्णांतरिं एकाद्या रे
सुमरूपें तू दिसशिल ना ?

रात्र वादळी असो भयंकर
खुशाल तारूं कापिल अंतर
कधिंतरि बिजलीरूपें अंबर
भेदुनि चमकुनि जाशिल ना ?

वाट यशाची शोधुनि शोधुनि
हताश कधिं मी येतां परतुनि
अवतरुनी पूजिल्या शिलेंतुनि
संजीवन मज देशिल ना ?
तू उभा पाठिशी असशिल ना ?

* *

## १३. एवढें गीत मला गाउं दे –

एवढें गीत मला गाउं दे
जनलोकाहुनि क्षणभर मजला
वेगळीच राहुं दे !—

सरसरली क्षण वळवाची सर
जलाशयावर तरंग नवथर
अवकाशांतुनि प्रसन्न सुंदर
मज वरवर जाउं दे !—

फुलाफुलांनीं, विहंगमांनीं
नादविली वासंतिक वाणी
त्या मनहारी स्वरवलयांनीं
अंकित मज होउं दे !—

होतां नजरानजर क्षणांची
जुळते प्रीति दोन मनांची
त्या प्रीतीच्या वीणेवरची
अंगुलि मज होउं दे !—

नादांमधुनी अनंत येथील
नाद खुलूं दे एकच आंतील,
जीवनांतुनी वास्तव, स्वप्निल
माझें मज घेउं दे
एवढें गीत मला गाउं दे !—

* *

## १४. सख्या, पहांट जाहली –

सरत निशा, उजळ उषा, फिकट चंद्रसाउली
सख्या, पहांट जाहली

शीत, गंधरुचिर, पवन मंद मंद वाहतो
कमलांना, कुसुमांना मृदुलकरें स्पर्शितो
कोटरांत विहगकुलें गुंफितीं स्वरावली
सख्या पहांट जाहली

मादक सुखसंभ्रमांत वृत्ति बावरी बने
वास्तवांत भानरहित स्वप्नगीत गुणगुणे
जागवि तिज तेज नवें किरणांच्या पाउलीं
सख्या पहांट जाहली

जागृत तन, जागृत मन, बघ जागें जनजीवन
नयनीं आनंद, मनीं नव-ध्येयांचें चिंतन
आवाहन करूं हरीस या जीवनमंगलीं
सख्या पहांट जाहली

* *

## १५. गाऊंया मंगल गान—

या गडे हासूंया, या गडे नाचूंया
गाऊंया मंगल गान

खेळूं या फुगडी धरूनियां फेर
रचूं या आरास चौरंगीं चौफेर
देऊंया, घेऊंया प्रेमाचा आहेर
मिळून थोरलहान !—

आपुली धरती, आपुलें आकाश
आपुला सागर, आपुला प्रकाश
सुनील नभांत गुंजते डौलांत
खगांची स्वच्छंद तान—

वादळाचें वारें घोंगावें जगांत
शांतिचें चांदणें माझ्या माहेरांत
मावेना आनंद दृष्टींत, देहांत
वाटतें हरपें भान—

या गडे हांसूंया या गडे नाचूंया
गाऊंया मंगल गान !

* *

## १६. भाववेगें येउं पाहे –

भाववेगें येउं पाहे मी तुझ्या रे मंदिरीं
साद तूझी ती खुणेची येईना श्रवणावरी

माझिया सुस्वागताला सज्ज उल्हासून तीं
बंद दारें पाहुनीयां आज भांबावे मती

धुंदिनें भारावलेले नेत्र तूझे स्वाप्निल
भावगंधें वेष्टिलेले बोल तूझे मंजुल

मग्नता ती चिंतनाची ती वृथा अस्वस्थता
स्मरत सारें झुरत राहे विरहिणी मी शंकिता

जीव माझा सानुला रे प्रीत माझी थोरली
लक्षपुष्पांनीं तुवां जी गंधवोनी ठेविली

गंध का होई नकोसा ? म्लान कीं झालीं फुलें ?
कोण कैसें पेटवीतें भाग्य माझें आगळें

कोठली पडसाद, तूझी साद येईना जरी
हरपलें कीं रत्न माझें जें रूळे वक्षावरी !

* *

## १७. जननांतरिचें प्रेम आपुलें –

तुला मला गे नकळत कळलें
जननांतरिचें प्रेम आपुलें

सोनेरी किरणांत सकाळीं
पाहिलेंस तूं हांसुन गालीं
स्मितासवें प्राणांत उमललें
जननांतरिचें प्रेम आपुलें

बोल मधाहुनि मोहकसा तव
तुझा फुलांहुनि कोमल पदरव
ऐकतांक्षणीं उरीं रुणझुणलें
जननांतरिचें प्रेम आपुलें

ज्योतीसम तव स्वरूप सोज्वल
मनोभाव अति स्निग्ध सुनिर्मल
निःश्वसनांतुनि तव दरवळलें
जननांतरिचें प्रेम आपुलें

स्पर्शामधली तुझी रागिणी
घुमत राहिली कणांकणांतुनि
सात सुरांना व्यापुनि उरलें
जननांतरिचें प्रेम आपुलें

स्वप्न नव्हे तू, सत्य शुभंकर
जागृतींत नांदसी निरंतर
विरहतमाला छेदुनि आलें
जननांतरिचें प्रेम आपुलें

## १८. सोनियाचा पाळणा—

सोनियाचा पाळणा, रेशमाचा दोर ग
मधोमध विसावला माझा चित्तचोर ग

नीज नाहीं डोळां कसा टकमक पाहतो
बाळमुठी वरखालीं नाचवीत राहतो
याच्या चांदण्यांत माझे लोचन चकोर ग

सुगंधित जळानें हा न्हाणियला तान्हुला
आभूषणवसनांनीं सजाविला सानुला
तीट काजळानें शोभे स्वपरूसुंदर ग

याच्या दर्शनानें येई सुखाला फुलोरा
याच्या स्पर्शनानें लाभे आशेला निवारा
प्रेमसूत्रें याच्या नाचे माझा मनमोर ग

वाडवडिलांची याच्या पाठिशीं पुण्याई
भाग्यशाली बाळ माझा आयुष्मंत होई
कुळकीर्ती उजळील असा सुकुमार ग

कुणी गाणें गुणगुणा, कुणि हालवा हिंदोल
झोपूं द्या ग राजीवाला, हीच विसाव्याची वेळ
धरा कृपादृष्टि याच्या शिरीं सानथोर ग
सोनियाचा पाळणा रेशमाचा दोर ग

* *

## ९. न कळतां निघून जा !

जायचें असेल तरी   न कळतां निघून जा !
फूल फूल हुंगितां,   चांदण्यांत गुंगतां
देहभान हरपतां   खुशाल मजपुढून जा !

गान गाइल्यावरी   बीन सारुनी दुरी
थकुनि नयन झांकितें,   त्या क्षणीं उठून जा !

केशपाश सोडुनी   त्यांत वदन झांकुनी
रुसुनि बैसतें तदा   लपत छपत दूर जा !

क्षणिक जायचें असें   लागुं दे तुला पिसें
विरहिं मीलनीं सुखें   मजसि गुंगवून जा !

आणि जर अखेरचें   तुज असेल जायचें,
जात जात पदतळीं   प्राण हे चुरून जा !
जायचें असेल जरी   न कळत निघून जा !

* *

१०७९

## २०. राष्ट्रध्वज फडकतो –

उजळित तेजें दिशा दहा
राष्ट्रध्वज फडकतो पहा

अभिमानाचें प्रेमसुखाचें
माहेरच हें मनामनांचें
दुजें त्रिवेणी तीर्थ अहा !

याच्या स्नेहामधें तेवती
कोटि उरांतिल स्फूर्तिज्योती
रविचंद्रांना दिपवित हा !

सत्य, अहिंसा, शांति शुभंकर
तीन रंग खुलतात तयावर
घोषित समता मंत्र महा !

लववा शिर, जुळवा कर दोन्ही
निष्ठेच्या घ्या शपथा चरणीं
चिर उन्नत राखा, सुखवा,
राष्ट्रध्वज फडकतो पहा !

* *

## २१. आठवतें दिनरात

तुला मी आठवतें दिनरात
तुझीच प्रेमळ मूर्ति विराजे
या वेड्या हृदयांत !

मला न भुलवी गान झऱ्यांचें
कूजन अथवा विहंगमांचें
अखंड घुमतो भाव मनोरम
बोल तुझा श्रवणांत !

वनीं ताटवा फुले फुलांचा
मला न भुलवी गंध तयांचा
अक्षय तुझिया स्पर्शफुलांची
तनूमनीं बरसात !

आठवणींच्या ज्योती लावुन
तुला शोधिते विरहतमांतुन
भेटीलागी आतुर होउन
प्राण उभे नयनांत
तुला मी आठवतें दिनरात

* *

## २२. आभाळाच्या अम्हीं मुली ( संघनृत्यगीत )

चैतन्याच्या चंचल पुतळ्या आभाळाच्या अम्ही मुली
भानमोकळ्या अम्ही हंसिका स्वर्गंगंगेच्या निळ्या जळीं

इंद्रधनूची उपडी होडी अम्हांस इथवर आणुन सोडी
भावभेटिनें समान झाली तुमची अमुची जातकुळी १

( कृषिकन्यांकडे वळून )

कृषिकन्यांनो सगुणसांवळ्या, कृषिकर्मीं रंगुद्या अम्हांला
अन्नब्रह्म निर्मायाला तृणातृणाच्या लक्षदळीं २

( नागरकन्यांकडे वळून )

चतुरकन्यका तुम्हि नगरांतील सांगा नवलकथा ग्रंथांतिल
उकलुनि दावा रहस्य आंतील जें दडलेलें जळीं स्थळीं ३

( परिचारिकांकडे वळून )

तुम्ही दयेच्या मूर्त देवता देहमनाचें दुःख शमवितां
सत्प्रेमाची द्याहो संथा प्रीत फुलूं द्या हृत्कमळीं ४

ही ज्ञानाची भूमि श्रमांची खाणच केवळ प्रेमसुखाची
जीवननिष्ठा या अवघ्यांची अक्षयज्योत जगीं उजळी ५

दिन मावळला संध्या आली उरीं घेउनी स्मृति येथली
निळ्या घराला चपल पाउलीं अम्ही निघालों याच पळीं ६

चैतन्याच्या चंचल पुतळ्या आभाळाच्या अम्ही मुली

* *

## २३. मी दिवाणी –

धुंदल्या संवेदनांनीं रंगली माझी कहाणी
मी दिवाणी मी दिवाणी

तोडुनियां बंध येथें बाल्य माझें वाहताहे
यौवनीं वार्धक्य वेडें डोकवूनी पाहताहे
कापुराची ज्योत झालें भूतभावीवर्तमानीं !
मी दिवाणी मी दिवाणी

जाहली मज मेघबाधा उरिं धरीं मी जीवनातें
नाचते मयुरापरी नित मीच माझ्या स्वागतातें
सुंदराचें स्वप्न माझ्या पाहिलेलें लोचनांनीं
मी दिवाणी मी दिवाणी

वेदनेला स्पर्शितां मी आसवांचें दान देते
स्नेहगाथा ऐकितां मी अर्पणाची साद देतें
मी चकोरी प्रेममग्ना, चंद्रवेडी रोमरोमीं
मी दिवाणी मी दिवाणी

* *

## २४. पुढतिं जायचें रे –

एकलेपणेंचि तुला पुढतिं जायचें रे
भीतीनें गांगरून
जरि कोणी धरिति मौन
अंतरिंचें गीत तुझें तुजसि गायचें रे

सरल्यावर सुगम पंथ
दूर दडुनि बसति पांथ
काट्यांतुनि तरिहि पुढें तुज सरायचें रे

जरि न करिति कुणि स्वागत
तरि दारोदार फिरत
प्रेमपूर्ण जग अवघें तुज करायचें रे

अंधारी रात्र असो
तेजाचा लेश नसो
तुज स्वयेंचि दीप बनुनि चिर जळायचें रे
एकलेंपणेंचि तुला पुढतिं जायचें रे !

* *

## २५. तुझ्याविना ब्रिजलाला –

तुझ्याविना ब्रिजलाला सदैव जीव सुना
नितान्त मंजुळ घे रे करांत वेणु पुन्हां !

तिच्या सुरम्य निनादें भुले अचेतनही
फुले निकुंज, वहाते सताल ही यमुना !

वहायचें विसरोनी नभीं समीर उभा
उभोंचि गोधन रानीं भुलोनि जाय तृणा !

अशा तुझ्या मुरलीची स्मृती न आज तुला
कशांत चित्त रमोनी त्यजून जासि जनां !

उदास मंदिरिं राधा हरी तुझ्या विरहें
सचिंत नंद यशोदा सुचे न कांहि कुणा !

जगास जीवन द्याया समर्थ तूंचि कन्हैया
किती विनंति करावी कशी न ये करुणा !

तुझ्याविना ब्रिजलाला सदैव जीव सुना !

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८५७८ वि: काव्य
क्रमांक १७६० नों: दि: २५।३।८०

## २६. स्वप्नांत येउं का ?

सत्यांत नाहिं आलें
स्वप्नांत येउं का ?

विसरायचें तरीही स्मरणांत सांठलेलें
तें रूप राजबिंडें पाहून जाउं का ?

हृदयांत रंगलेलें लाजेंत गुंतलेलें
ओठांवरी उभें तें गाऊन जाउं का ?

हंसतां नभांत तारा हंसतां फुलांत वारा
प्राणांत हांसतें तें दावून जाउं का ?

तूझी म्हणून घ्यावें स्वप्नींच हें घडावें
ही आस सानुलीशी पुरवून घेउं कां ?

सत्यांत नाहिं आलें
स्वप्नांत येउं का ?

* *

## २७. फिरुन एकदां–

फिरुन एकदां नभीं असावा पूर्णचंद्र प्रीतिचा
फिरुन एकदां मनीं ठसावा भाव नवा नवतिचा !

उभी असावी एकटीच मी नदिच्या कांठावर
घुमवित पावा कुणी असावा कदंबशाखेवर
मंतरल्यागत बघत रहावें टक लावुनियां मुखीं
होउनि जावें जनलज्जेला घटकेमाधिं पारखी
फिरुनि एकदां असा जुळावा डाव नजरबंदिचा !

पायाखालीं खुशाल अपुला अधिरा जिव अंथरुन
फिरुन एकदां वाट बघावी काळिज नेत्रीं धरुन
फुलासारखे बोल वदावे गंध भरावा उरीं
दिसरातीचें भान हरावें कर गुंफावें करीं
फिरुन एकदां पायीं घुमावा पैंजण बेहोषिचा !

ही विरहाची काळनागिणी डंखुनि गेली मला
सुखसर्वस्वा मुकलें ग मी अंगीं भरल्या कळा
कशी कळेना साद घालुं मी शोधूं कवण्यादिशीं
मी हतभागी धरून राहूं आस उराशीं कशी
फिरुन एकदां तरी दिसावा राजहंस स्वप्निंचा

फिरुन एकदां नभीं असावा पूर्णचंद्र प्रीतिचा !

* *

## २८. तूं नसतांना –

वेगळेंच भासे जग मम नयनांना
मनरमणा ! मजसमीप तू नसतांना !

किरणांना कांति मलिन म्लानता फुलांसी
कर्णकटू कोकिलरव वाटे श्रवणांसी
नाउमेद व्यापितसे करचरणांना
मनरमणा ! मजसमीप तू नसतांना !

रेखियल्या चित्रांतुन रंग जमेना
सारिकाहि मनहारी बोल वदेना
अंकावर स्वरविहीन व्याकुळ वीणा
मनरमणा ! मजसमीप तू नसतांना !

जनरीती भासतसे मज विपरीत
वनवासी असते जरि मी स्वजनांत
तुझियाविण जीव झुरे, धीर उरेना
मनरमणा ! मजसमीप तू नसतांना !

* *

REFBK-0010601
REFBK-0010601

## २९. विसरून जा, विसरून जा !

स्वप्नजीवन आपुलें
विसरून जा, विसरून जा !

कांहि हळवें, धीट कांही,
मूक कांही भाववाही
अंतरीं आकारलें—
विसरून जा, विसरून जा.

रंगवेड्या पाकळ्यांनीं
नादवीलें पानपानीं
गीत तें गंधांतलें—
विसरून जा, विसरून जा.

वांछिल्याविण लाभलेलें
प्रत्ययाविण जाणिलेलें
तें जगाहुनि वेगळें—
विसरून जा, विसरून जा.

* *

## ३०. हे हिंदभूमिच्या प्राणा !–

हे हिंदुभूमिच्या प्राणा—
तुझा तिरंगा वेष मनोहर
सुखवि सदा जननयनां,

तूं शांतीचा दूत तुझा रे
निर्भयतेचा बाणा.

दिशेदिशेंतुन छेडित जासी
प्रेमसुखाची वीणा,

चंद्रसूर्य हे तुझे सोयरे
प्रिय तू देवगणांना,

चिरसुंदर तू, चिरउन्नत तू
तू अवघ्यांचा राणा,

ध्वजराजा ! तुजमुळें जनांतरिं
उन्नत अमुच्या माना,

भूदेवीचा मंगलमणि तू,
प्रणाम तुझिया चरणां

हे हिंदभूमिच्या प्राणा !

२०६०९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत ★ ★
अनुक्रम ........................ विः .. .....
क्रमांक ........................ नोंः ३२ः .....